# प्रेस नोट

दिनांक १७.०८.२०१९

## सिडको कार्यालयाचे प्लॉट अलॉटमेंट बाबतचे बनावट पेपर तयार करून फसवणुक करणा-या आरोपीस आर्थिक गुन्हे शाखा कक्ष-१, नवी मुंबई कडुन अटक

---------------------------------------------------------------------------

फिर्यादी श्री. विनोद शंकर सोनटक्के रा. १०१, रत्नवल्लभ को.ऑप.हौ. सोसायटी, सेक्टर-२०, सी. बी.डी. बेलापुर, नवी मुंबई यांनी दिलेल्या तक्रारीवरून एन.आर.आय.सागरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि. क्रमांक १९८/२०१९ भादंवि कलम ४२०, ४०६, ४६५, ४६६, ४६७, ४७१, ३४ अन्वये दाखल करण्यात आला आहे. नमुद तक्रारीमध्ये प्लॉट क्रमांक जी- ६९, सेक्टर-२०, सी.बी.डी. बेलापुर, नवी मुंबई हा प्लॉट सिडको कार्यालयाकडुन कोणासही अलॉट करण्यात आलेला नसताना सदरचा प्लॉट दिनानाथ दिवडया म्हात्रे यास अलॉट झाल्याबाबत सिडको कार्यालयाचे बनावट कागदपत्रे तयार करून त्या कागदपत्राचा वापर करून त्या प्लॉटवर बिल्डींगचे बांधकाम करून त्यातील फ्लॅट फिर्यादी व इतर व्यक्तीस विक्री करून त्यांची फसवणुक केल्याने वरिल प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नमुद गुन्हयाच्या तपासामध्ये बनावट कागदपत्राच्या अधारे बिल्डींगचे बांधकाम करणारे आरोपी मंजी जेशा चौधरी व महादेव खिमजी दुबारिया यांना दिनांक ०१/०७/२०१९ रोजी अटक करण्यात आली होती. तसेच सदर प्लॉटचे बनावट कागदपत्रे तयार करणारे आरोपी **लवेश रघुनाथ जावध व निवृत्ती धर्मा पाटील** यांचा शोध चालू होता. सदर आरोपीचा शोध घेवुन ते मिळुन आल्याने दिनांक १४/०८/२०१९ रोजी त्यांना अटक करण्यात आली आसुन आरोपीस दिनांक १७/०८/२०१९ रोजी पर्यत पोलीस कोठडी रिमांड मिळालेली आहे. नमुद आरोपीत यांच्याकडे सिडकोच्या बनावट कागदपत्राबाबत तपास करण्यात येत आहे तसेच सदर गुन्हयामध्ये आणखी काही आरोपीचा सहभाग आहे काय या बाबत तपास करण्यात येत आहे.

नमुद गुन्हयाचा तपास मा. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक सदानंद सोनकांबळे आ. गु.शा. कक्ष-१, नवी मुंबई हे करत आहेत.

-----------------